(41)

क्र. जमीन २६९४/११२०/प्र.क्र. ६५३७/ज३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - ४ डिसेंबर १९९५

विषय - जमीन - मुंबई उपनगर जिल्हा

स.नं. ३५६ - अ.पै. न.भू.क्र. १२६ पै. मौजे चेंबूर येथील जमीन मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस विद्युत उपकेंद्रासाठी देणेबाबत ...

....

<u>ज्ञापन</u>

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्र. कार्या-३/टी/वशी ३८३/९४, दिनांक २०.७.१९९४ च्या वरील विषयाच्या पत्राच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस महात्मा फुले नगर येथील संरक्षित झोपडपट्टीवासियांना वीज पुरवठा करण्यासाठी मौजे चेंबूर येथील स.नं. ३५६ - अ.पै.न.भू.क्र. १२६ [पैकी] मधील २० फू.x२० फू.=४०० चौ.फूट [३७.२८ चौ.मी.] जमीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे] नियम, १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार व याबाबत जिल्हाधिकाऱ्यांस योग्य वाटतील अशा अन्य अटी/शर्तीवर सदर जमिनीची प्रति चौ.मी. रु. ५७२०/- इतक्या तात्पुरत्या किंमतीप्रमाणे त्या किंमतीच्या १५% इतके प्रतिवर्षी भाडे आकारून १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने पुढील अतिरिक्त अटीवर देण्यास शासन मंजुरी देत आहे.:-

<u>अटी</u> - १] विद्युत केंद्रासाठी मंजूर केलेले क्षेत्र मंजूर सुधारित विकास योजनेत खेळाचे मैदानासाठी आरक्षित क्षेत्राचा भाग असल्याने सदरचे ३७.२० चौ.मी. क्षेत्र हे एका कोपऱ्यात असावे जेणेकरून खेळाचे मैदानाचे क्षेत्रात कमीत कमी घट होईल.

२] मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम व शासन अंतिमरित्या ठरविल त्या दराने भाड्याची रक्कम यामधील फरकाची रक्कम विहित दराने व्याजासह भरण्यास तयार असल्याचे मुद्रांकित हमीपत्र कंपनीकडून लिहून घ्यावे.

२. हे ज्ञापन, नगर विकास विभाग व वित्त विभागाचे ज्ञापन क्र. विप्रअ १०९२/प्र.क्र. १४२/९२[विनिमय] दि. १.८.१९९२ अन्वये या प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

20158 III D.

II-A

(६४५)

[स्वाक्षरी]
[ द. शि. फाटक ]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

Scanned by CamScanner

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एम. आर. डी. ऐ. इमारत,
वान्द्रे [पू.] मुंबई - ४०० ०५१.

प्रत रवाना-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३] जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे
४] उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
५] सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई.
६] अति. जिल्हाधिकारी [ अतिक्रमणे ] मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा
७] मॅनेजर [ टेक्नीकल ] बी. एस. ई. एस. लि. इलेक्ट्रिक हाऊस, सांताक्रूझ पूर्व, मुंबई - ४०० ०५५.
८] वित्त विभाग, मंत्रालय.
९] नगर विकास विभाग.
१०] निवड नस्ती, ज-३, कार्यासन, महसूल व वन विभाग.

Scanned by CamScanner

(51 A)

क्र. कक्ष ३डी/एल - ~~५७८~~ ५०८

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय [ बी.एम.आर.डी.ए. इमारत, २रा मजला, वांद्रे(पूर्व) ] मुंबई ४०० ०५१.

दिनांक - २४-१-१९९६

वाचले- १. शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन २६९४/११९०/ प्र.क्र.५५४७/ज-२ दिनांक ४.१२.९५

२. मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी यांचे हमीपत्र दिनांक ८.१.९६

**आदेश**

मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीस महात्मा फुले नगर येथील संरक्षित झोपडपट्टीवासियांना वीज पुरवठा करण्यासाठी मौजे चेंबूर येथील स.नं. ३५८ अ पै. न.भू.क्र. १२८ पैकी मधील २० फूटx २० फूट = ४०० चौ.फूट [३७.२७ चौ.मी. ] जमीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल [ सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे] नियम १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदी नुसार सदर जमिनीची प्रति चौ.मी. रु. ५७२०/- इतक्या तात्पुरत्या किंमतीप्रमाणे त्या किंमतीच्या १५ टक्के इतके प्रतिवर्षी भाडे आकारुन १० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने पुढील अटीवर देण्यात मंजुरी देण्यात येत आहे.

१. विद्युत केंद्रासाठी मंजूर केलेले क्षेत्र मंजूर सुधारित विकास योजनेत खेळाचे मैदानासाठी आरक्षित क्षेत्राचा भाग असल्याने सदरचे ३७.२० चौ.मी. क्षेत्र हे एका कोपऱ्यात असावे जेणे करुन खेळाचे मैदानाचे क्षेत्रात कमीत कमी कपात होईल.

२. पट्टेधारक कंपनीने जमिनीची तात्पुरत्या प्रती चौ.मी. रु.५७२०/- प्रमाणे होणाऱ्या पूर्ण बाजारभावाच्या किंमतीच्या १५ % दराने निश्चित केलेली तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु. ३२,०४५/- तहसिलदार कुर्ला यांचे कार्यालयात आगाऊ भरणा करावी.

३. मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम व शासन अंतिम रित्या ठरविल त्या दराने भाडयाची रक्कम यामधील फरक ही रक्कम विहीत दराने व्याजासह तहसिलदार कुर्ला कार्यालयात भरणा करावी.

Scanned by CamScanner

४. मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने केवळ नाक्याच्या वापरा व्यतिरिक्त कोणते इतर सर्व बांधकाम अगदी तात्पुरत्या स्वरूपात असावे.

५. मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीने सदर जमिनीचा वापर ज्या कारणासाठी जमीन दिली आहे त्याच कारणासाठी करावा.

६. प्रश्नाधिन जमीन किंवा तिचा कोणताही भाग शासनाने लेखी पूर्व संमतीशिवाय कोणी पोटपट्टा वा गहाण टाकू नये.

७. शासनाच्या किंवा कोणत्याही शासनाचे अखत्यारातील स्थ स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरिता प्रश्नाधिन जमिनीची आवश्यकता भासल्यास त्याबाबतीत जिल्हाधिकारी पट्टेदारास एक महिन्याची लेखी नोटीस देऊन हा भाडेपट्टा कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

८. उक्त भाडेपट्टा समाप्त झाल्याबद्दल पट्टेदाराला कोणत्याही भरपाई दाखल (७/७) मागण्याचा अधिकार असणार नाही व जमिनीचा ताबा ज्या स्थितीत होता त्या स्थितीत त्याचा व कब्जा तो जिल्हाधिकारी यांच्या स्वाधीन करील.

९. शासनाच्या धोरणाप्रमाणे फक्त संरक्षित झोपडीधारकाला मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी विद्युत जोडणी देईल.

१०. उक्त अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू भाडेपट्टा रद्द झाल्याचे समजण्यात येऊन प्रश्नाधिन जमीन सरकार जमा करण्यात येईल.

११. प्रश्नाधिन जमिनीचा ताबा कंपनीने नगर भूमापन अधिकारी क्र.८ टोपीवाला बिल्डींग मुलुंड(प) मुंबई ८० यांचेकडून घ्यावा तत्पूर्वी तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु. ३२,०५५/- [illegible] तहसिलदार कुर्ला यांचेकडे प्रथम भरणा करावी.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे.

(जिल्हाधिकारी) मुंबई उपनगर जिल्हा करिता

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,
व्यवस्थापक
मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनी लि.
सप्लाय डिव्हीजन पो.बॉ.नं. ६८०८
इलेक्ट्रीक सिटी हाऊस, सांताक्रुझ(पू.)
मुंबई ४०० ०५५.

Scanned by CamScanner

53A

-४-

प्रत-

१. नगर भूमापन अधिकारी क्र.८, टोपीवाला बिल्डींग, मुलुंड[प] मुंबई ४०० ०८० यांचेकडे जरूर त्या कार्यवाही करिता रवाना.

त्यांनी पट्टेधारक कंपनीने वरील प्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम भरणा केल्याची प्रथम खात्री करावी व त्यानंतर सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविण्यात आलेल्या २० x २०= ४०० चौ.फु.[३७.२०]चौ.मी. जमिनीचा ताबा मुंबई उपनगर विद्युत पुरवठा कंपनीला देऊन ताबा पावतीच्या व नकाशाच्या ३/३ प्रतिसह पूर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा तसेच मिळकत पत्रिकेत जरूर त्या नोंदी घेऊन त्याची प्रतीसादर करावयात.

प्रत-

१. तहसीलदार, कुर्ला यांचेकडे भाडेपट्टा रकमेच्या वसुलीसाठी रवाना.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

३४१९६
पेंढकर